**स्थायी निदेश क्र. ०४**

न्यायालयीन प्रकरणांकडे प्राधान्याने लक्ष पुरविणेबाबत

नगरपरिषद प्रशासन संचालनालय
गृहनिर्माण भवन (म्हाडा) तळमजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
क्र. सीओडी - १२०/प्र. क्र. १३५/२०००/२
दिनांक : ३१ ऑगष्ट २०००

## प रि प त्र क

सदस्य, औद्योगिक न्यायालय, अकोला यांनी माझ्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, औद्योगिक न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या तक्रार अर्जावर प्रतिवादी (मुख्याधिकारी नगरपरिषद) यांचेतर्फे लेखी कथन (written statement) विहित मुदतीत न्यायालयात सादर करण्यात येत नाही. त्याचप्रमाणे लेखी कथनाच्या पृष्ठयर्थ तक्रारदाराच्या तक्रारीचे खंडन करण्यासाठी प्रतिवादी (मुख्याधिकारी नगरपरिषद) यांचेमार्फत कागदपत्र देखील दाखल केले जात नाहीत. एवढेच नव्हे तर अर्जदाराचा साक्षीपुरावा पूर्ण झाल्यानंतर प्रतिवादी यांचेतर्फे साक्षीपुरावा घेण्यासाठी वेळोवेळी तारखा घेण्यात येतात, मात्र साक्षीपुरावा दाखल केला जात नाही. उदा.औद्योगिक न्यायालय, अकोला येथील युएलपी क्र. २८/८६ ते ३०/८६ च्या तक्रार अर्जासंबंधात वाशिम नगरपरिषदेने लेखी कथन सादर करण्यास तेरा वर्षे लावली. अशा मध्ये न्यायालयीन कामकाजात अडथळा निर्माण होतो. ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे.

०२. मी, डॉ. भगवान सहाय, संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई याद्वारे राज्यातील सर्व मुख्याधिकारी यांना आदेशित करीत आहे की, न्यायालयीन प्रकरणांकडे प्राधान्याने व गांर्भीयाने व्यक्तिश: लक्ष द्यावे, न्यायालयांना सहकार्य करावे आणि नगरपरिषदेची बाजू वेळीच समर्थपणे मांडण्याची दक्षता घ्यावी. यापुढे त्यांचेकडून न्यायालयीन कामकाजात अडथळा निर्माण केल्याचे अगर वेळीच नगरपरिषदेचा जबाब सादर न केल्यास किंवा आवश्यक असल्यास न्यायालयाच्यां निर्णयाविरुध्द मुदतीत अपील न केल्याचे माझ्या निदर्शनास आल्यास संबंधीत मुख्याधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कडक कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

सदर आदेश प्राप्त झाल्याची पोच त्वरीत पाठवावी.

(भगवान सहाय)
संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय